**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : २३/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री.सुकराम काशिराम इंगळे,**
**मु.पो.उमाळी, ता.मलकापुर, जि.बुलडाणा**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, मलकापुर, ता.मलकापुर, जि.बुलडाणा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, मलकापुर, ता.मलकापुर, जि.बुलडाणा**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : ०१.०८.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ०७.०१.२०२२ | १४.०२.२०२२ | २१.०२.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.३१७/२०१८ दि. ०७.०१.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक ०१.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी बाळासाहेब दराडे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.आर.व्ही.सुरडकर हे उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गोविंद वाघ हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र.३१७/२०१८) मध्ये दिनांक ०७.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून " जन माहिती अधिकारी व निवासी नायब तहसिलदार यांनी तहसिल तसेच तलाठी कार्यालयात मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ बाबत झालेला पत्रव्यवहार याची प्रत विनामुल्य नोंदणीकृत डाकने अर्जदारास पुरवून

तसा अहवाल दि.२१.०२.२०२२ पर्यंत आयोगास सादर करावा. २. मागितलेली माहितीपैकी मुद्दा क्र.२ व ३ बाबत पुर्तता झाल्याचे समजण्यात यावे. ३. वस्तुस्थिती पाहता प्रस्तुत प्रकरणात शास्ती किंवा शिस्तभंग झाल्याबाबत आदेश नाही. ४. जर अर्जदार यांना अजुनही काही तक्रार राहिले असेल, तर त्यांना २२.०३.२०२२ पर्यंत तक्रार अर्ज दाखल करण्याची संधी राहील." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र. ३१७/२०१८ यात दि.०७.०१.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात परिच्छेद क्र.१४ चे अनुपालन झाले नसल्याचे आक्षेप नोंदवित श्री.सुकराम इंगळे यांनी वरील तक्रार अर्ज दाखल केला असून यात आदेशाचे अवमान केले असल्याने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १६६ नुसार फौजदारी कार्यवाही करावी तसेच रु.२५,०००/- ची शास्ती कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी सादर केलेल्या खुलाश्याचे अवलोकन केले असता, वरील आदेशात जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांनी तहसिल तसेच तलाठी कार्यालयात मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ बाबत झालेला पत्रव्यवहार याची प्रत विनामुल्य नोंदणीकृत डाकने अर्जदारास पुरवून तसा अहवाल आयोगास सादर करावा, असे नमूद केले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी शास्ती किंवा शिस्तभंग झाल्याबाबत कुठलाही आदेश पारित केलेला नाही. वरील आदेशाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, मलकापूर यांचेवतीने दि.१४.०२.२०२२ रोजी अपिलकर्ता यांनी मागिलेल्या मुद्या क्र.१ बाबत झालेल्या पत्रव्यवहारांची एकूण २५ पृष्ठांची माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे दि.१४.०२.२०२२ रोजी तक्रारकर्त्यास प्रदान करण्यात आली असून आयोगास तसेच तहसिलदार मलकापूर यांना देखील रजिष्टर करण्यात आले असल्याचे आढळून येत आहे. याच प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.बाळासाहेब दराळे यांनी त्यांचे लेखी खुलाश्यात तक्रारदार श्री.इंगळे यांना उपलब्ध माहिती विहीत मुदतीत विनामुल्य पुरविली असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज खारिज करावे, अशी विनंती केली असून तक्रारदार हे वारंवार बेकायदेशीरपणे शासकीय जमीनीवर अतिक्रमण केलेले जमीन त्यांना हवी असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाचा वैयक्तीक स्वार्थ:साठी वारंवार वापर करुन शासकिय अधिकारी / कर्मचारी यांचेवर दबाव टाकण्याकरिता माहितीचा अर्ज दाखल करित असल्याचा आक्षेप नोंदविला आहे. प्रस्तुत प्रकरणी दोन्हीही बाजु ऐकल्यानंतर द्वितीय अपील क्र.३१७/२०१८ यात दि.०७.०१.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता, यातील परिच्छेद क्र.१४ च्या निर्देशाचे अनुपालन जन माहिती अधिकारी यांचेकडून दि.१४.०२.२०२२ रोजी झाले असून द्वितीय अपील



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

अर्जाच्या सुनावणीतच आयोगाने प्रस्तुत प्रकरणात शास्ती किंवा शिस्तभंग कार्यवाहीची मागणी फेटाळली असल्याने व आयोगाचे आदेशाचे अनुपालन झाले असल्याने प्रस्तुत तक्रार तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून सदर तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०१.०८.२०२३**

जावक क्रमांक ९८३ दिनांक 09 JAN 2024